महाराष्ट्र शासन
वन विभाग

**वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय**

(नवीन प्रशासकीय इमारत, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, नागपूर 440 001.)
email id : ccftnagpur@mahaforest.gov.in

**आदेश/ई-मेल व्दारे**

**विषय** : लेखापाल (गट-क) संवर्गातून मुख्य लेखापाल (गट-क) संवर्गात पदोन्नती व पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत.

**क्रमांक** : कक्ष-1/आस्था-अ/पदोन्नती/प्र.क्र.14/2025-26/1613
**दिनांक** : 12 ऑगस्ट, 2026

लेखापाल (गट-क) संवर्गातील खालील लेखापालांना मुख्य लेखापाल (गट-क) या संवर्गात खालील अटी व शर्तीचे अधिन राहून खुल्या प्रवर्गात जेष्ठतेने वेतन मॅट्रीक्स मधील एस:13 35400-112400 या वेतन स्तर मध्ये तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. व मुख्य लेखापाल (गट-क) या संवर्गात त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर नमुद केल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ. क्र. | लेखापालाचे नाव (सर्वश्री) | सद्याचे कार्यरत विभाग | पदोन्नती नंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| 1. | अपर्णा हर्षल निमजे | उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर | मुख्य लेखापाल, वनसंरक्षक (प्रादे.) नागपूर वनवृत्त, नागपूर यांचे कार्यालय |
| 2. | कुलभुषण नवनाथ तेलंग | उपसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया | मुख्य लेखापाल, उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांचे कार्यालय |
| 3. | राजु गोविंदराव पटले | वनसंरक्षक (प्रादे.) नागपूर | मुख्य लेखापाल, उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग, गोंदिया यांचे कार्यालय |
| 4. | नेहा नरेश वेदी | विभागीय वन अधिकारी, नवेगाव- नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली | मुख्य लेखापाल, विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण भंडारा यांचे कार्यालय |
| 5. | सुनंदा अविनाश नांदे | वनसंरक्षक (प्रादे.) नागपूर | मुख्य लेखापाल, उपसंचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया यांचे कार्यालय |
| 6. | कल्पना मेघश्याम सोनवाने | विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, वर्धा | मुख्य लेखापाल, उपसंचालक, बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा यांचे कार्यालय |

**अटी व शर्ती :-**

1.0 ह्या आदेशाव्दारे पदोन्नती दिलेले कर्मचारी ज्या तारखेला पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होतील त्या तारखेला त्यांची पदोन्नतीचे पदावर वेतन निश्चिती करण्यात येईल. तथापी, ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजनेंतर्गत किंवा आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लेखापाल या संवर्गाची वरिष्ठ वेतन श्रेणी आधीच लागू करण्यात आली असेल, अशा कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती पुन्हा करण्यात येणार नाही.

2.0 सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात असल्याने परिस्थितीनुरुप आवश्यक वाटल्यास पदोन्नतीचे आदेश रद्दबादल करण्यात येईल किंवा आवश्यकतेनुसार कनिष्ठतम् कर्मचाऱ्यास पदावनत करण्यात येईल.

3.0 ज्या कर्मचाऱ्यांविरुध्द सदर आदेश प्राप्त होण्यापुर्वी विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून अथवा संबंधितास निलंबनाखाली ठेवण्यात आले असले तर सदर पदोन्नतीचा आदेश लागू होणार नाही. याबाबत खातरजमा संबंधित कार्यालय प्रमुखाने करावी.

नागपूर

4.0 पदोन्नत लेखापाल सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासून 7 दिवसांचे आंत पदस्थापित ठिकाणी रूजू न झाल्यास संबंधितास पदोन्नतीची आवश्यकता नाही, असे गृहित धरून पुढील कार्यवाही कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता करण्यात येईल, याबाबत नोंद घ्यावी.

5.0 ज्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना मागासवर्गीय बिंदूवर नियुक्ती देण्यात आली आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांचा मागावर्गीय जातीचा दावा आहे अशा कर्मचाऱ्यांची भविष्यात त्यांचे मागासवर्गीय प्रवर्गात सामायोजन करावयाचे असल्याने जात वैद्यता प्रमाणपत्राची आवश्यकता राहील. अशा प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांचे जातीचे प्रमाणपत्र तपासणीमध्ये खोटे असल्याचे आढळून आल्यास त्यांना तात्काळ पदावनत करण्यात येईल व त्यांचे विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

6.0 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-वशिअ-1214/ प्र.क्र.26/11, दिनांक 02-जुन-2014 अन्वये पदोन्नती करीता मत्ता व दायित्व यांची वार्षिक विवरणपत्र सादर करणे अनिवार्य असल्याने संबंधित कार्यालय प्रमुखाने सदर विवरणपत्र सादर केल्याबाबतची खात्री करूनच पदोन्नतीचे आदेश संबंधित कर्मचाऱ्यास हस्तांतरीत करावे, अन्यथा तसे या कार्यालयास पुढील कार्यवाहीस अवगत करावे.

7.0 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-एसआरव्ही-2015/ प्र.क्र.303/का-12, दिनांक 12-सप्टेंबर-2016 अन्वये वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर पदोन्नती नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नाव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील 2 वर्षे होणाऱ्या निवड सूचिमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या नावाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच त्यांना यापूर्वी आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ दिले असल्यास ते काढून घेण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

3. संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी उपरोक्त पदोन्नत मुख्य लेखापाल यांना त्यांचे पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्यास्तव स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांचा कार्यमुक्त दिनांक या कार्यालयास कळवावा.

4. उपरोक्त पदोन्नत मुख्य लेखापाल यांनी त्यांचे पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू व्हावे. संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी पदोन्नत मुख्य लेखापाल यांचा रूजू व कार्यमुक्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(जी. गुरुप्रसाद)**
वनसंरक्षक (प्रादे.) नागपूर
वनवृत्त, नागपूर.

प्रति,
वरिलप्रमाणे सर्व कर्मचारी
**मार्फत - संबंधित नियंत्रक अधिकारी**

**प्रतिलिपी - (माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव)**
उपवनसंरक्षक, नागपूर/वर्धा/गोंदिया.
उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया
उपसंचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर/बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा/नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया
विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, वर्धा/भंडारा.
विभागीय वन अधिकारी, नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली.
कक्ष- प्रमुख आस्था-ब निर्देशन विभाग, नागपूर

**प्रतिलीपी** - अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सविनय सादर.